वृत्तवेध

समाज, संस्कृती, लोकमानस!

सोमवार, १५ ऑक्टोबर २०१८ , खंड: १६ , अंक: सहावा , पाने : २



डॉ. एपीजे अब्दुल कलाम (माजी राष्ट्रपती) जयंती.

तापमान

कमाल ३४.२° से
किमान १९.८° से

दिनविशेष

जागतिक अंध सहाय्यता दिन, वाचन प्रेरणा दिन, वृत्तपत्र विक्रेता दिन.

संक्षिप्त

रेल्वे आरक्षणाचा मार्ग सोपा

पुणे : १२ ऑक्टोबरपासून मध्य रेल्वेच्या पुणे विभागातील सर्व रेल्वेस्थानकांवर 'यु टी एस' मोबाईल पद्वारे रेल्वेचे जनरल तिकीट काढण्याची किंवा आरक्षित करण्याची सुविधा रेल्वे प्रशासनाने उपलब्ध करून दिली आहे. या अंतर्गत प्रवाशांना रेल्वे स्थानकाजवळील दोन किलोमीटर अंतरापर्यंत रेल्वेचे जनरल तिकीट मिळवता येणार आहे. याद्वारे तिकीट बुक केल्यास छापील तिकीट दाखविण्याची आवश्यकता नाही तसेच या पद्वारे आरक्षित केलेले तिकीट रद्द करता येणार नसल्याची सूचना रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

पिंपरी ते निगडी मेट्रो पुढील वर्षी धावणार?

पुणे : महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन (महामेट्रो) प्रशासनाने २९ सप्टेबर रोजी प्रकल्प अहवाल पिंपरी-चिंचवड महापालिकेला सादर केला. अहवालामध्ये महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन (महामेट्रो) प्रशासनाने डिसेंबर २०१९ पर्यंत पिंपरी ते निगडी हा सुमारे पाच किमी पर्यंतचा मार्ग पूर्ण करून मेट्रो सेवा सुरू करण्याचा निर्धार केला आहे. अहवालानुसार या पाच किमीच्या मार्गावर तीन स्थानकांचा समावेश असून या मार्गासाठी सुमारे अकराशे कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.

पी एम पी बसेस होणार चकचकीत

पुणे : पीएमपी प्रशासनाकडून बसेसच्या स्वच्छतेसाठी आधुनिक स्वयंचलित स्वच्छतायंत्र खरेदी करण्यात आली आहेत. प्रत्येक यंत्राची किंमत सहा लाख रुपये आहे. या यंत्रांच्या मदतीने केवळ नऊ ते दहा मिनिटात बस स्वच्छ होणार आहे. पहिल्या टप्प्यात पुणे स्टेशन, स्वारगेट, कोथरूड, मार्केट यार्ड, शेवाळेवाडी, पिंपरी या सहा आगारांमध्ये ही यंत्रणा बसविण्यात आली आहे.

पुणेकरांचे पाणी शेतीला

पुणे : १५ ऑक्टोबर ते २३ नोव्हेंबरपर्यंत जलसंपदा विभागातर्फे रब्बी हंगामातील शेतीला चार अब्ज घनफुट (टीएमसी) पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. पुणे शहरासाठी दररोज देण्यात येणाऱ्या १३५० एम एल डी पाणी पुरवठ्यामध्ये कपात करण्यात आली आहे.

खंडणीप्रकरणी टिळेकरांविरुद्ध गुन्हे

पुणे : पुणे, कोंढवा भागात एका कंपनीच्या अधिकाऱ्यांना धमकावून त्रास देत पन्नास लाख रुपयांची खंडणी मागीतल्याच्या आरोपावरून भाजप आमदार तसेच भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष योगेश टिळेकर व अन्य तिघांविरुद्ध खंडणी मागणी, चोरी, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, तोडफोड करणे, संगनमत करणे आदी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

इच्छामरण म्हणजे आत्महत्या नव्हे : विद्या बाळ

आतील पानावर. .

पाणी समस्येसाठी पालकमंत्र्यांना घेराव

पुणे पोलिसांच्या कुटुंबीयांचा फर्ग्युसन रस्त्यावर 'रास्ता रोको'

स्नेहा पाटोळे

पुणे : ऐन नवरात्रोत्सवात शिवाजीनगर पोलीस वसाहतीतील पाणीपुरवठा गेल्या तीन दिवसांपासून बंद असल्याने संतप्त झालेल्या पोलिसांच्या कुटुंबीयांनी वसाहतीबाहेर आणि ज्ञानेश्वर पादुका चौकात रविवारी रास्ता रोको आंदोलन केले. तसेच येथील रहिवाशांनी थेट पालकमंत्री गिरीश बापट यांच्या निवासस्थानी मोर्चा काढला.

"तुर्तास टँकरने पाणी पुरवठा करू आणि पाणी का येत नाही, याबाबत चौकशी करून लवकरात लवकर हा प्रश्न सोडवू" असे आश्वासन पालकमंत्र्यांनी दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. आंदोलनानंतर संध्याकाळी पाच वाजता वसाहतीसाठी पाणी सोडण्यात आले होते. पोलीस लाईन वगळता इतरत्र मात्र पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा होत आहे. मात्र लाईनमध्ये तीन दिवसांपासून पाणी येत नसल्याने संतप्त झालेल्या पोलिसांचे कुटुंबीय रविवारी सकाळी रस्त्यावर आले. काही वेळ ज्ञानेश्वर पादुका चौकात रास्ता रोको आंदोलन केले. आंदोलन केल्यानंतर काही तासातच सुमारे २० मिनिट वसाहतीमध्ये पाणी पुरवठा करण्यात आला.

पालमंत्र्यांना घेराव घालताना पोलीस कुटुंबीय

खडकवासला कालवा फुटीनंतर शहराच्या अनेक भागात पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे .शिवाजीनगर पोलीस लाईनमध्ये पूर्वीपासूनच कमी दाबाने अपुरा पाणीपुरवठा होत होता. गेल्या तीन दिवसांपासून जलसंपदा विभागाने पालिकेचे पंप बंद केल्याने एसएनडीटी जलकेंद्रातून अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने शिवाजीनगर, गोखलेनगर, मॉडेल कॉलनी या परिसरात अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याचे कारण दिले आहे.

महिलांचा संताप

मुलांची परीक्षा व सण सुरू आहेत, असे असताना तीन दिवसांपासून घरात पाणी नाही. आजूबाजूच्या परिसरात २४ तास पाणी आहे, मग पोलिस लाइनवरच अन्याय का? आमचे पती २४ तास ड्यूटी करतात आणि आम्हाला हंडाभर पाण्यासाठी वणवण करावी लागते. आम्ही चौथ्या मजल्यावर राहतो, एखाद्या मंत्र्याने एक पाण्याचा हंडा चौथ्या मजल्यावर नेऊन दाखवावा." अशा शब्दांत महिलांनी संताप व्यक्त केला.

सफाई कर्मचारी अधिकाऱ्यांनाही जुमानेनात

वर्तणूक सुधारण्याचा प्रशासनाचा इशारा

विक्रम मोरे

पुणे: अधिकाऱ्यांचे कर्मचाऱ्यांवर नियंत्रण राहिले नसून, जवळपास नव्वदहुन अधिक सफाई कर्मचारी हे शिपायाची कामं करतात, हा मुद्दा आज कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या बैठकीत चांगलाच गाजला , त्यावर "संबंधित अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या वर्तनावर नजर ठेवली पाहिजे, चुकत असेल तर त्यात सुधारणा करा" असा आदेश बोर्डाचे अध्यक्ष लेफ्टनंट जनरल मेजर प्रिथी सिंग यांनी दिला.

बोर्डाचे मा. उपाध्यक्ष, नगरसेवक अतुल गायकवाड यांनी बैठकीत हा मुद्दा उपस्थित केला. सफाई कर्मचाऱ्यांना शिपायांपेक्षा अधिक वेतन मिळते,परंतु हे कामगार शिपाई कर्मचाऱ्यांचे काम करतात. हा निर्णय कुणी घेतला? मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना याबद्दल काहीही माहीत नाही, असे त्यांनी अध्यक्षांच्या निदर्शनास आणून दिले.

यासंदर्भात मी वेळोवेळी संबंधित वॉर्ड मुकादम यांना जाब विचारलेला आहे,सदर मुकादम नेहमी कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याचे उत्तर मला देत असतात. त्यामुळे तीन महिन्यांअगोदर मी बोर्डाचे मुख्य आरोग्य निरीक्षक संजय झेंडे यांना माझ्या वॉर्डातील कार्यरत असलेल्या एकूण सफाई कर्मचाऱ्यांची यादी मागितली होती. सदर यादी त्यांनी मला तीन महिन्यानंतर तीही अर्धवट स्वरूपात दिली. त्या यादीचा लक्ष्यपूर्वक अभ्यास केला असता,मला असे दिसून आले की,बहुतेक सफाई कर्मचारी हे आपला विभाग सोडून बोर्डाच्या इतर कार्यालयात शिपाई, मदतनीस, आदी. पदावर काम करत आहेत, त्यामुळे वॉर्डातील सफाईच्या कामाचा व्याप राहिलेल्या कर्मचाऱ्यांवर येतो, त्यातही कायमस्वरूपी कर्मचारी हे कामच करत नाही, त्यामुळे कामाचा सर्व व्याप पुन्हा कंत्राटी कामगारांवर

बऱ्याच दिवसांपासून या मतदार संघात सफाई होत नसल्याच्या तक्रारी अनेक नागरिक व स्थानिक सामाजिक मंडळे यांनी केलेल्या आहेत.

-**अतुल गायकवाड,** नगरसेवक

मनोहर पर्रीकर यांची प्रकृती खालावली

मनोहर पर्रीकर

पणजी : गेल्या काही दिवसांपासून गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पार्रीकर स्वादुपिंडाच्या कर्करोगावर अ. भा. आयुर्विज्ञान (एम्स) संस्थेत उपचार घेत होते.

प्रकृती खालावल्यामुळे रविवारी (१४) त्यांची ऑक्टोबर रोजी पार्रीकर यांना पणजी येथे निवासस्थानी नेण्यात आले आहे. त्यांच्या निवासस्थानातच रुग्णालयासारखा कक्ष तयार करण्यात आला आहे. पर्रीकर यांना अतिशय गुप्तपणे व ताबडतोब पणजीत आणल्यामुळे त्यांच्या प्रकृती संदर्भात उलट सुलट चर्चा होत आहे.

भर वर्गात मुख्याध्यापकांची हत्या

बंगळुरू : कर्नाटक मधील बंगळुरू शहरात एका शाळेत मुख्याध्यापकाची भर वर्गात हत्या करण्यात आली. मुख्याध्यापक मुलांना शिकवत असताना सहा मारेकऱ्यांनी त्यांच्यावर हल्ला चढवला. त्यावेळी वर्गात २० विद्यार्थी हजर होते. रंगनाथ नायक असे हत्या झालेल्या मुख्याध्यापकाचे नाव असून ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शिकवत होते.

प्रात्यक्षिकाद्वारे अमेरिकेकडून भारताचे ईव्हीएम 'हॅक'

मिशिगन: अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी भारतातील ईव्हीएम हॅक करून दाखवलेआणि साध्या मायक्रोप्रोसेसरने निकालही बदलता येतो हे सुद्धा सिद्ध केले आहे. मिशिगन विद्यापीठातील शास्त्रज्ञ प्रा. जे. ॲलेक्स हेल्डरसन व त्यांच्या नेतृत्वाखालील पथकाने भारतातील ईव्हीएम सहजपणे हॅक करता येते, याच्या प्रत्यक्षिकाचा एक व्हिडिओ ऑनलाइन प्रसिद्ध केला आहे.

बीबीसी ने याबाबतचे वृत्त दिले आहे की, ईव्हीएम ला असणाऱ्या डिस्प्ले सारखाच एक इमिटेशन डिस्प्ले बोर्ड तयार केला,त्या बोर्डखाली एक मायक्रोप्रोसेसर आणि ब्लु टूथ रेडिओ लपवला अशी माहिती प्रा.हेल्डरसन यांनी दिली.

सावरगावात दसरा मेळाव्याची जय्यत तयारी

पंकजा मुंडे

बीड : भगवान गडावरील दसरा मेळाव्याची प्रथा खंडित झाल्यानंतर ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांनी आपल्या दसरा मेळाव्याचं डेस्टिनेशन निवडलं ते म्हणजे संत भगवान बाबांचं जन्मगाव सावरगाव. याच सावरगावमध्ये भगवान बाबांच्या स्मारकाचं लोकार्पण दसऱ्याला होणार आहे. दसरा मेळाव्याला गर्दी जमवण्यासाठी पंकजा मुंडे समर्थकांमध्ये जणू स्पर्धा लागल्याचं चित्र सध्या पाहायला मिळतंय.

खासदार प्रीतम मुंडे यांच्यासह पंकजा मुंडेंनीही सोशल मीडियाच्या माध्यमातून भाविक आणि समर्थकांना दसरा मेळाव्याचं निमंत्रण दिलं आहे.

दसरा जवळ आला की राज्यात दोन मेळाव्यांची चर्चा होते. एक म्हणजे शिवसेनेचा शिवतीर्थावरील दसरा मेळावा आणि दुसरा पंकजा मुंडे यांचा दसरा मेळावा. अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील भगवान गडावर होणाऱ्या दसरा मेळाव्याची परंपरा गडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी खंडित केल्यानंतर पंकजा मुंडे यांनी सावरगावमध्ये दसरा मेळावा भरवून शक्तीप्रदर्शन केलं. यावर्षी तर पंकजा मुंडे भगवान बाबांच्या भव्य स्मारकाचं लोकार्पण करणार आहेत.

भगवान बाबांची पाण्यावर तरंगणारी २५ फुटांची मूर्ती साकारण्यात येत आहे. ही मूर्ती बनवण्याचं काम प्रख्यात शिल्पकार प्रमोद कांबळे हे करत आहेत.

विशेष म्हणजे संपूर्ण मूर्ती उच्च दर्जाच्या पॉलिस्टरमध्ये तयार करण्यात आली असून सध्या या मूर्तीचं काम हे अंतिम टप्प्यात आहे. येत्या १७ तारखेला ही मूर्ती सावरगाव येथे नेण्यात येणार आहे. १८ तारखेला म्हणजे दसरा मेळाव्यात या मूर्तीचं लोकार्पण होईल.

चिमुकल्यांची तस्करी करणारी टोळी गजाआड

मुंबई: उद्योगामध्ये कमी पगारात राबविणाऱ्या कोवळ्या हातांच्या तस्करीचे प्रकार वाढत चालले आहेत. कारखाने आणि छोट्या युनिट मध्ये काम करण्यासाठी मुलांची तस्करी करणाऱ्या टोळीला मुंबई पोलिसांनी पकडले आहे. बिहार आणि नेपाळहून मुलांना घेऊन मुंबईत आलेल्या पाच जणांना शनिवारी पोलिसांनी अटक केली असून त्यांच्या तावडीतून १३ ते १६ वर्ष वयोगटातील २१ जणांची सुटका करण्यात आली आहे. बालमजुरी विरोधात काम करणाऱ्या 'प्रथम' संस्था आणि 'पालवी चाईल्ड लाईन' या संस्थेच्या प्रतिनिधींच्या सतर्कतेमुळे ही घटना उघडकीस आली आहे. मुलांची तस्करी केल्या प्रकरणी पोलिसांनी मोहोम्मद सादिक मन्सुरी, सुकेश्वर राऊत, एकलाक हसन, जाफर शेख या पाच जणांविरुद्ध नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.

लिफ्ट देणे पडले महाग

पुणे : रात्रीच्या वेळी तरुणीस लिफ्ट देणे एका शाखा अभियंत्यास महागात पडले आहे. लिफ्ट मागणाऱ्या तरुणीला दुचाकीवर बसवल्या नंतर तिने विनयभंग केल्याचा आरोप करून धिंगाणा सुरु केला. त्यानंतर ब्लॅकमेल करून चौदा हजार रुपयांची रोकड घेतल्याची घटना घडली. ही घटना साधू वासवानी चौकात बुधवारी रात्री पावणे अकराच्या सुमारास घडली. या प्रकरणी सत्तावन वर्षाच्या शाखा अभियंत्याने या प्रकरणी बंड गार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आता दारूही ऑनलाइन?

मुंबई : ड्रंक अँड ड्राइव्ह केसचं प्रमाण कमी करण्यासाठी हे पाऊल उचलण्याचा राज्य सरकारचा मानस आहे. जर अशी घरपोच दारू मिळाली तर महाराष्ट्र हे दारू घरपोच देणारं देशातलं पहिलं राज्य असेल. उत्पादन शुल्क मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी ही माहिती दिली.

ते म्हणाले, 'दारू पिऊन गाडी चालवल्यामुळे होणारे अपघात टाळणे हा यामागचा प्रमुख उद्देश आहे. नशेत गाडी चालवून होणाऱ्या अपघातांची संख्या मोठी आहे. यात अनेक जण मृत्युमुखी पडतात. जशा इ-कॉमर्स वेबसाइट असतात तशाच माध्यमातून जशी भाजी, फळे घरी येतात तशी दारूही घरपोच येईल.'

शेफ विष्णू मनोहर यांचा विश्वविक्रम

नागपूर : विष्णू मनोहर यांनी १४ ऑक्टोबर रोजी नागपूर येथे पाच तासांत २५६ किलो तांदूळ, १२५ किलो मुगडाळ, १५० किलो चणाडाळ, ५० किलो मीठ , १०० किलो गाजर , ३००० ली पाणी, मटार,५० किलो दही, ४० किलो कोथिंबीर इ. साहित्य वापरून ३००० किलो खिचडी बनविण्याचा विश्वविक्रम केला.

या खिचडीची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड, एशिया बुक ऑफ रेकॉर्ड, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये करण्यात येणार आहे .

भारतीय सुगम संगीताचा ऑस्ट्रेलियन सूर !

आशिष कोठावदे

पुणे : ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात "सोलफूल स्ट्रिंग्स" म्हणून एक सुरगीतांची मैफिल बंड गार्डन, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. ह्या मैफिलीसाठी आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या गायिका "मेगन ब्रूमर" आल्या होत्या. ब्रूमर ह्या सिडनी, ऑस्ट्रेलिया येथील रहिवासी आहेत. त्यांचा सिडनी येथे "मंत्र" नावाचा प्रसिद्ध बँड आहे. त्या अंतर्गत ब्रूमर 'भजनसंध्या' हा कार्यक्रम करत असतात. त्याचबरोबर ब्रूमर ह्यांनी जगभरात अनेक ठिकाणी विविध नामवंत कलावंतासोबत त्याचे कार्यक्रम केलेले आहेत. विशेष म्हणजे त्या परदेशी असूनही पुणे येथील कार्यक्रमात त्यांनी छान अशी हिंदी व मराठीतील भजनं त्यांच्या सुरेल आवाजात गायिली. श्रोत्यांसाठी हा आश्चर्याचा सुरेल धक्का होता!

अध्यात्मिक क्षेत्रात तसेच गायनाची आवड असणाऱ्या ब्रूमर ह्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या लेखिका, योगा आणि ध्यान प्रशिक्षिका, आर्ट ऑफ लिव्हिंगच्या प्रशिक्षिका, तसेच वेडींग सेलेब्रन्ट म्हणून कार्यरत आहेत. ब्रूमर ह्यांच्याशी बोलतांना कळाले की, वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षापासून त्यांनी योगा करायला सुरुवात केली. स्क्वॅश कोर्ट या ठिकाणी एका लहान शेतकरी समुदायाबरोबर त्या योगसराव करीत असत. त्यांचे बालपण हे झिम्बाब्वे, आफ्रिका या ठिकाणी गेले. त्यांना लहानपणापासूनच योग प्रशिक्षक बनण्याची ईच्छा होती त्यासाठी १९९९ साली त्या भारतात वाराणसी येथे आल्या आणि २००१ साली त्या योग प्रशिक्षिका बनल्या.

अध्यात्मिक क्षेत्राकडे वळण्याचे मुख्य कारण व अविस्मरणीय प्रसंग सांगताना त्या म्हणाल्या की, "भारतात योगाभ्यासावेळी काही काळ मी निसर्गाच्या सानिध्यात पर्वतरांगांमध्ये राहत होते. त्यावेळी तेथील एक समूह दररोज रात्री भजन व सत्संग करीत असे. त्यामधली उर्जा आणि शक्ती ही अभूतपूर्व होती. तेव्हापासून मी भजन आणि सत्संग करण्यास सुरुवात केली आणि आजतागायत मी जिथे असेन तिथे न चुकता मी ते करत आहे". त्यात त्यांनी एक गोष्ट आवर्जून सांगितली की भजन आणि सत्संगामध्ये त्यांना एवढा रस निर्माण झाला की त्या अलीकडे पाश्चिमात्य संगीत (गाणी) फारशी गात नाहीत. "माझ्या अध्यात्मिक उत्सुकतेमध्ये भर पडण्याचे अजून एक मुख्य कारण म्हणजे मी भारत दौऱ्यावर आली असतांना नेपाळ या ठिकाणी आर्ट ऑफ लिविंग ह्या संस्थेचा हॅप्पीनेस प्रोग्राम म्हणून एक कार्यशाळा चालू होती आणि त्या कार्यशाळेत सहभागी झाल्यानंतर मी खऱ्या अर्थाने अध्यात्माकडे वळले". त्या पुढे म्हणाल्या की "मला समाजाला एक संदेश द्यायचा आहे की, अध्यात्मातून तुम्हाला खऱ्या समाजसेवेचा आणि नीतिमत्तेचा अनुभव येईल. सत्संग आणि भजनातून मानसिक स्थैर्य, प्रेमभाव व उदारता लाभत असते. या सगळ्यातून तुम्हाला काय मिळते यापेक्षा तुम्ही समाजाला काय देऊ शकता हे महत्वाचे आहे".

सहानुभूती नको संधी द्या : रिना पाटील

पुणे : आमच्यासारख्या काठीच्या आधारावर जीवनाशी दिनरात संघर्ष करणाऱ्या सर्वांना आज सहानुभूतिची गरज नसून संधीची गरज आहे. अशा भावना रिना पाटील यांनी व्यक्त केल्या.

रिना सांगतात की , माझे गांव विसापुर जेव्हा माझ्या आई वडिलांना मी अंध असल्याचे आढळून आले तेव्हा त्यांनी खुप औषोधपचार केले पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यानंतर त्यांनी मला शिक्षणसाठी पुण्यात पाठवले. पुण्यात मुलींची अंध निवासी शाळेत माझे चौथी पर्यंत शिक्षण पूर्ण केले. नंतर पुढचे शिक्षण महिला आश्रम हायस्कूल मध्ये पूर्ण केले. व सेंट मिराज मध्ये मी कॉलेज पूर्ण केले. त्या दिवसात अंध असल्याचे खुप वाईट वाटत होते. त्यातूनही नेहमीच परिवाराचे व शिक्षकांचे मार्गदर्शन असल्यामुळे परिस्थितीचा स्विकार करुन पुढे जायचे ठरवले.

आशावादी व सुदृढ

रिना सध्या राष्ट्रीय दृष्टिहिन संघ पुणे यामधे सचिव म्हणून काम करतात. त्याचबरोबर देना बँक मध्ये क्लार्क म्हणून काम करतात. आम्ही आशावादी व सुदृढ आहोत, असे त्या आत्मविश्वासपूर्वक सांगतात.

या काळात काम करतांना अनेक वाईट प्रसंग आले. अंध लोकांचा भांडवल म्हणून वापर करतात. अंध दिन असेल तर एकच दिवस त्यांच्या सोबत फ़ोटो काढून समाजकार्य केले असल्याचे दाखवतात आम्ही पाहू शकत नाही पण तुम्ही पूर्ण जग पाहू शकता अनुभवू शकता तर त्याचा चांगला वापर करा. शारीरिकदृष्ट्या अपंगत्व असले म्हणून ती व्यक्ती काहीच करू शकणार नाही हा समजच मुळात चुकीचा आहे आणि तो मला पूर्णतः खोडून काढायचा आहे. आम्ही म्हणत नाही की पैसे देऊन मदत करा असे नाही तर काही शब्द प्रेमाने बोलले तर आम्हाला ही बरे वाटेल. समाजात बरे-वाईट अनुभव अजूनही येतात यामुळे ध्येयाप्रती आत्मविश्वासाने जाताना मी खचले नाही. आपली परिस्थिती बदलण्यासाठी बाहेरून कोणी येईल याचा विश्वास न ठेवता आपल्यावर आलेली वेळ इतर अंध मुलां-मुलीवर येऊ नये म्हणून कार्यरत झाले.

अभिव्यक्ती

२

१५ ऑक्टोबर २०१८

मराठी वाचन संस्कृतीची मुळं अजून खोलवर रुजवण्याच्या उद्देशाने वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने बोरिवली येथे मोबाईल ग्रंथालयाचे उदघाटन केले.
#वाचनप्रेरणादिन

-विनोद तावडे,

माझ्या आई वडिलांनी मला दिलेली सर्वात मोठी भेट म्हणजे त्यांनी मला खेळण्याचं स्वातंत्र्य दिलं. ज्यांचे पालक खेळाचे साहित्य विकत घेऊन देऊ शकत नाहीत त्यां मुलांना खेळाचे साहित्य भेट देऊन आपण भारतभराच्या मुलांच्या चेहऱ्यावर हसू आणू शकतो. त्यांना खेळण्याची संधी भेट देऊ .
#दानउत्सव

- सचिन तेंडुलकर

संपादकीय

उसाच्या गोडव्याने शिक्षण कडू

देश महासत्ता होण्याची स्वप्न पाहत आहे. आणि स्वप्न पाहण्यात काही गैर नाही. पण महासत्ता होणार म्हणजे नक्की काय होणार याचे चित्र काही स्पष्ट होताना दिसत नाही. एका बाजूला विकासाचा प्रचारतंत्र सुरू असताना दुसरीकडे एक मोठा वर्ग विकासाच्या सर्वच घटकांपासून दुरू लोटला जात आहे. यातीलच एक घटक म्हणजे ऊसतोड मजूर आणि त्यांची मुलं. दरवर्षी राज्याच्या विविध भागातून अंतर्गत स्थलांतर करणाऱ्या मजूरांची संख्या काही लाखांमध्ये आहे. यामध्ये ऊसतोड, खाणीत काम करणारे, विट भट्ट्यांवर काम करणारे, बांधकमांवर काम करणारे, रस्ते बांधणीसाठी काम करणारे इत्यादी इत्यादी... ही यादी वाढतच जाते. इथे केवळ मजूरच स्थलांतरीत होत नाहीत तर त्यांच्यासोबत त्यांची मुलंही स्थलांतरीत होत असतात. या स्थलांतरणामुळे या मुलांच्या शिक्षणाची प्रचंड आबाळ होते. लाखो मुलं शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर फेकली जातात. राज्यात 250 पेक्षा जास्त साखर कारखाने आहेत. या कारखान्यांवर ऊस तोडण्यासाठी दरवर्षी दहा ते बारा लाख ऊसतोड मजूर स्थलांतरीत होत असतात. या मजूरांसोबत त्यांची दीड ते दोन लाख मुलंही स्थलांतरीत होतात. स्थलांतरणाच्या या काळात मुलांच्या शिक्षणाचे काय होते हे शासनालाही माहीत नाही. याचे कारण राज्यात ऊसतोड मजूरांची संख्या किती आहे याची अधिकृत आकडेवारी देखील खुद्द शासनदरबारीही नाही. विविध संस्था, अभ्यासकांच्या मते दहा ते बारा लाख ऊसतोड मजूर असावेत असा अंदाज बांधला गेला आहे. बारामती जवळील सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या परिक्षेत्रातील ऊसतोड मजूरांच्या मुलांच्या शिक्षणासाठी 'आशा' नावाची एनजीओ काम करते. त्यांनी केलेल्या सर्वेक्षणात त्यांना ऊसतोडणीसाठी आलेल्या मजूरांसोबत स्थलांतरीत झालेली ९४५ मुलं सापडली. ज्यांची शाळा स्थलांतरणामुळे बंद झाली होती. हे फक्त एका कारखान्याचे उदाहरण झाले. सरासरीच काढायची झाल्यास प्रत्येक हंगामात किमान दोनशे कारखाने सुरू असतात. प्रत्येक कारखान्यावर आपण सातशे मुलं जरी पकडलीत तरी हा आकडा दीड लाखांपर्यंत जातो. यावरून या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न किती गंभीर आहे. याची जाणीव सहज होऊ शकते.

पुण्यातील गोखले इन्स्टिट्यूट मधील डॉ. डेबाशीश नंदी यांनी ऊसतोड मजूरांच्या मुलांच्या शिक्षणवार अभ्यास करून एक अहवाल सादर केला होता. त्यातून समोर येणारी माहिती अतिशय धक्कादायक आहे. डॉ. नंदी यांनी अहमदनगर, पुणे आणि सातारा या तीन जिल्ह्यातील २३ गावं, ६३८ कुटुंबं आणि ७७३ मुलांचे सर्वेक्षण केले. यातून त्यांना असे आढळून आले की, या ७७३ मुलांपैकी ९८.५० मुलं ही स्थलांतरणाच्या काळात शाळांपासून पूर्ण तुटलेली आहेत. समाजात असुरक्षितता एवढी वाढली आहे की आपल्या मुलांना कोणाच्याही जबाबदारीवर ठेऊन जायला पालक तयार होत नाहीत. ऊसतोडणीला आलेल्या ठिकाणचा परिसर नवीन असल्यामुळे तिथेही कुणाच्या विश्वासावर मुले शाळेत घालयाची?, कोणी ओळखीचे नसते, ऊसाच्या शेतांपासून शाळा दूर असतात, सहा महिन्यांच्या या उसतोडीच्या काळात राहण्याचा ठावठिकाणा नसतो, ११ ते १२ वर्षांवरील मुलांवर पालकांनी सर्रास ४० ते ५० हजार उचल घेतलेली असते, ऊसतोड कामगार ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणी चोरांची भिती असल्यामुळे कोपेची राखण करण्यासाठी मुलांना घरी ठेवले जाते, ज्या मज़ुरांची मुले अगदीच लहान आहे त्यांचा सांभाळ करण्यासाठी मोठ्या भावंडांना घरी ठेवले जाते. अशा एक ना अनेक कारणांमुळे मुलांचे शिक्षण थांबते. त्यामुळे मुलांची इच्छा असो वा नसो त्यांना काम करावेच लागते.महाराष्ट्र शासनाने 'राईट टू एज्युकेशन' च्या अंतर्गत २०१५ मध्ये स्थलांतरीत उसतोड मजुरांच्या मुलांच्या शिक्षणासाठी काही तरतूदी केल्या आहेत. यासाठी २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात ४२ कोटी ४८ लाख रुपयांची तरतूद केली होती. यामध्ये त्यांच्या निवासाची सोय, जेवण, शैक्षणिक साहित्य आदीसाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे ८ हजार २०० रुपये खर्च केले जाणे अपेक्षित होते. यानूसार शासनाने जालना जिल्ह्यातील सुमारे ५१,०१८ मुलांना नियमित शाळेत पाठविल्याचा दावा केला आहे. याची शहानिशा होणे गरजेचे आहे. एकीकडे आपण डिजिटल इंडियाची स्वप्न पहातो, आणि विकासाच्या मोठ्या मोठ्या गप्पा मारतो. पण दुसरीकडे आजही ही मुले केवळ शालेय शिक्षणासाठी झगडत आहेत. एकीकडे आपण स्वच्छ भारताचा नारा देतो मात्र दुसरीकडे स्वच्छ हा शब्द देखील त्यांना माहिती नाही; हा विकासाचा विरोधाभास नाही का?

'मी-सुद्धा' म्हणजे 'कोण' नाही

"नाना पाटेकर असं करूच शकत नाही.", "हा पब्लिसिटी स्टंट आहे.", "ही काय धुतल्या तांदळाची आहे काय?", " तिचे सिनेमे बघा. नाना पाटेकरवर ती जे आरोप करतीय त्याहून बरंच काय काय इमरान हाश्मी वगैरे सहकलाकारांसोबत अगदी आनंदानं केलंय तिनं." या सगळ्या प्रतिक्रियांमध्ये काहीतरी खटकण्यासारखं आहे. कलम ३५४ अ, ब, क, ड येण्यासाठी २०१३ ला निर्भया घडावं लागलं. सामान्य माणसाच्या भाषेत सांगायचं तर, चोरून फोटो काढणे, पाठलाग करणे, परवानगी शिवाय स्पर्श करणे, स्त्रीला उद्देशून अश्लील उद्गार काढणे, बळजबरीने कपडे उतरवायला लावणे इत्यादी पुरुषांच्या वर्तणुकीला ३५४ ने गुन्हा ठरवले आणि त्यासाठी भरगोस शिक्षेची तरतूद केली. हा गुन्हा आहे याचा साक्षात्कार व्हायला आपल्याला २१वं शतक उजाडावं लागलं. याआधी या वर्तणुकीला आपण पाऊस वाऱ्यासारखं निसर्ग म्हणून स्वीकारलं होतं. आणि छत्रीचा शोध लावावा, तसा आपण '७ च्या आत घरात' चा शोध लावला होता.

तनुश्री दत्ता इत्यादींच्या आरोपात किती तथ्य आहे हे न्यायालयात सिद्ध होईल. आपण आपल्या मानसिकतेचा विचार करू. कायदा हे सुधारणेमधलं एक भक्कम पाऊल असलं तरी फक्त कायदा करून समाज सुधारत नाही. #METOO या ५ अक्षरात या परिस्थितीचं गांभीर्य लक्षात येतंय. "मी सुद्धा" म्हणजे "कोण नाही !?!".

आपलं मत तयार करताना आपण काही मुद्दे लक्षात घेतले पाहिजेत, आपण पुरुष प्रधान समाजात राहतो, स्त्रीच्या शारीरिक संवेदना पुरुषापेक्षा अधिक असतात. 'हा मुलगा माझा पाठलाग करतोय' हे स्वतःच्या आईला, बहिणीला अगदी मैत्रिणीला सांगताना सुद्धा मुलीला भीती वाटते. कारण एखादा मुलगा तुझ्या मागे येतोय म्हणजे तुझंच काहीतरी चुकलं असणार असं म्हणणाऱ्यांची संख्या आपल्याकडे जास्त आहे. या तक्रारींमुळे चालू असलेलं शिक्षण, नोकरी बंद होऊन घरी बसण्याची सक्ती होईल ही देखील भीती असते. नायिका म्हणून कोणी आधीच्या सिनेमात काही 'बोल्ड सिन' केले असतील म्हणजे ती पुढच्या सिनेमातल्या एखाद्या सिनला विरोध करू शकत नाही हे गृहीतक चुकीचं आहे. वैश्याव्यवसाय करणारी स्त्री देखील तिच्या इच्छेने एखाद्याला बोलण्यापासून, स्पर्श करण्यापासून रोखू शकते आणि त्याने ते न ऐकल्यास कलम ३५४ खाली दाद मागू शकते. पडद्यावर दिसणाऱ्या कलाकारामधला पडद्यामागचा माणूस वेगळा असू शकतो आणि तो आपल्याला माहित नसू शकतो. मराठीपणापेक्षा माणूसपण मोठं असतं. "ते मराठी आहेत, ते नाम फौंडेशनचं काम करतात, किती छान अभिनय करतात" याचा आणि त्यांनी गैरवर्तन केलं की नाही याचा एकमेकांशी काहीही संबंध नाही.

आपण व्यक्तिपूजक होणं थांबवलं पाहिजे. यातून मूळ मुद्दे बाजूला राहतात. #METOO मोहिमेवर चर्चा होताना अशा प्रसंगांमध्ये त्या पीडित स्त्रीने, सहकर्मचाऱ्यानी, निर्मात्यांनी, पोलिसांनी, महिला आयोगांनी काय केलं पाहिजे, त्या स्त्रीला कोणते अधिकार आहेत वगैरेवर बोललं जाणं अपेक्षित होतं पण आपण नाना पाटेकरवर अडकून बसलोय. चळवळ उभी करायला फार हिंमत लागते. #METOO वाया घालवली तर पुन्हा पुढच्या पिढयांना #WEALL उभी करावी लागेल.

रुपयावर भीतीचे सावट

अर्थकारण
मृणाल शुक्ल

भारतीय रुपयाने ऐतिहासिकरित्या निचांकी पातळी गाठली आहे. आज एका अमेरिकन डॉलरसाठी ७४ रुपये मोजावे लागत आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी डॉलर आणि रुपया यांचा विनिमय दर हा एका डॉलरसाठी एक रुपया असा होता.

आज रुपयाचीच नाही तर बऱ्याच महत्त्वाच्या देशांच्या चलनात देखील घसरण झाल्याचे दिसते. सर्वप्रथम अमेरिकेने तुर्कस्थानच्या मालावर लावलेल्या आयातशुल्कामुळे तुर्कस्तानचे चलन 'लिरा'चे सुमारे 35 टक्क्यांहून अधिक प्रमाणात अवमूल्यन झाले. याचे पडसाद म्हणून रुपयाचे देखील अवमूल्यन झाल्याचे दिसते. तसेच अमेरिका-चीनचे व्यापार युद्ध, आंतरराष्ट्रीय बाजार पेठेतील पेट्रोल व डिझेलच्या किंमतीत झालेली वाढ, अमेरिकेने इराणवर लावलेले निर्बंध यामुळे देखील रुपयाची घसरण झाली. सरकारी उपाययोजना व मध्यवर्ती बँकेच्या धोरणामुळे व्याजदर, परकीय व्यापारातील तूट, विदेशी विनिमय, व्यापारा अंतर्गत गुंतवणुकीवरील घटत जाणारा परतावा यामुळे डॉलर्सचा ओघ घटला असून रुपयाची घसरणही झालेली आहे.

पैशाच्या पुरवठ्यात मध्यवर्ती बँकेकडून वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे उत्पादन क्षमतेत देखील वाढ झालेली आहे व भारताकडून होणाऱ्या निर्यातीत वाढ होणे अपेक्षित आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयाने खनिज उत्खननावर घातलेल्या बंदीमुळे खनिजांची निर्यात घटली आहे. तसेच रासायनिक खते व कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे भारतात उत्पादित झालेली फळे व भाजीपाला खरेदी करण्यास अनेक देशांनी नकार दिला आहे. अमेरिकेने भारतीय औषध निर्मिती कंपन्यांवर फसव्या पद्धतीने औषध बनविण्यात येत असल्याचे आरोप करत औषध खरेदीवर निर्बंध घातले आहेत. अशा अनेक कारणांमुळे प्रत्यक्षात मात्र निर्यातीत घट झाल्याचे दिसत आहे.

पेट्रोल व डिझेलच्या वाढत्या किंमती तसेच आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंसाठी जास्त किंमत मोजावी लागत आहे. परिणामी देशात महागाई वाढली आहे. प्रत्यक्ष परकीय गुंतवणुकीचा ओघ कमी होत आहे. यामुळे देखील भारतात डॉलरचा पुरवठा कमी झाला आहे. लाखो भारतीयांना दैनंदिन जीवनात अनेक गोष्टींसाठी उदाहरणार्थ- परदेशातील शिक्षण, व्यावसायिक बैठका, पर्यटन, परदेशात केली जाणारी गुंतवणूक, तसेच संरक्षणासाठी लागणारी साधन सामुग्री खरेदी करणे, कच्चामाल खरेदी करणे इत्यादी अनेक कारणांसाठी अब्जावधी डॉलर्सची गरज भासते. परंतु भारतात डॉलरच्या मागणी व पुरवठ्यातील असमतोलामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत डॉलरचा तुटवडा जाणवत आहे.

पुढील काळात अशीच परिस्थिती राहिली तर रुपया आणखी घसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. जगभरातील जवळजवळ सर्वच देशांच्या चलनात घसरण होत असल्याने रुपयाची घसरण ही चिंतेची बाब नसल्याचे रिझर्व बँक ऑफ इंडियाने सांगितले आहे. केंद्र सरकारने भारतीय रुपयाच्या चलनातून परदेशात केलेल्या गुंतवणुकीवर मिळणाऱ्या व्याजावर प्राप्तिकर न आकारण्याचा निर्णय घेतला आहे. भविष्यात मध्यवर्ती बँक व सरकार योग्य प्रकारच्या धोरणांचा अवलंब करून या समस्येवर योग्य उपाय योजना आखेल अशी अपेक्षा आहे.

शाश्वत विकासांच्या प्रयत्नांना नोबेल



पॉल रोमर

विल्यम नोर्डहॉस

सोमवार, दिनांक ८ ऑक्टोंबर २०१८ रोजी रॉयल स्वीडिश अकॅडमी ऑफ सायन्सेस तर्फे २०१८ चे अर्थशास्त्रासाठीचे ५० वे नोबेल पारितोषिक जाहीर करण्यात आले. विल्यम नोर्डहॉस व पॉल रोमर हे अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

विल्यम नोर्डहॉस (७७) यांना 'हवामान बदलाचे अर्थशास्त्र' या संबंधित संशोधनासाठी पुरस्कार देण्यात आला आहे. विल्यम हे अमेरिकेतील येल विद्यापीठात अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक आहेत. विल्यम यांचे संशोधन समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या दीर्घकाळीन परिणामासंबंधी आहे. विल्यम हे पहिले व्यक्ती आहेत, ज्यांनी हवामान व अर्थशास्त्र यांच्या परस्पर क्रियेचे वर्णन करणारा मूल्यनिर्धारित विश्लेषणात्मक प्रबंध सादर केला आहे. विल्यम यांना हवामानातील बदल हे फायदा आणि तोट्याच्या स्वरूपात सादर करता यावेत म्हणून एक आराखडा विकसित करायचा आहे. त्यांनी जीवाश्म इंधन व हरितगृह वायू उत्सर्जन यांसारख्या समस्यांवर उपाय म्हणून सर्व देशांवर कार्बन कर आकारणे हा उपाय सुचवला आहे.

पॉल रोमर (६२) यांना 'तंत्रज्ञानातील बदल व अर्थशास्त्र' या संबंधित संशोधनासाठी नोबेल पुरस्कार देण्यात आला आहे.पॉल हे अमेरिकेतील न्यूयॉर्क विद्यापीठात अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक आहेत. ते जागतिक बँकेचे प्रमुख अर्थतज्ञ देखील होते. पॉल यांचा सिद्धांत हा अर्थसत्तेच्या अंतहीन वाढीसाठीच्या संशोधनाचा पाया आहे. त्यांच्या प्रबंधाच्या अंमलबजावणीसाठी सरकारने संशोधन व विकास आणि पेटंट संबंधित कायद्यांसाठी अर्थसहाय्य द्यावे अशी त्यांची अपेक्षा आहे. तसे झाल्यास बाजाराच्या अर्थशास्त्रामध्ये नवनवीन कल्पनाद्वारे वस्तू व सेवांचे उत्पादन करता येईल.

दोन्हीही अर्थशास्त्रज्ञांनी अर्थसत्तेच्या शाश्वत विकासाचे प्रश्न हाताळले आहेत. विल्यम व पोल यांना या नोबेल पुरस्काराचे वितरण १० डिसेंबर रोजी स्टॉक होम येथे करण्यात येणार आहे. पुरस्काराची रक्कम ९० लाख स्वीडिश क्रोनर (सुमारे १० लाख डॉलर) एवढी असून दोघांमध्ये विभागून देण्यात येणार आहे.

इच्छामरण म्हणजे आत्महत्या नव्हे : विद्या बाळ

मुलाखत
-मृदगंधा दीक्षित

विद्या बाळ या लेखिका, संपादक, सामाजिक कार्यकर्त्या आहेत. १९६४ ते १९८३ या काळात 'स्त्री' मासिकाच्या त्या सहाय्यक-संपादक राहिल्या असून १९८३ ते १९८६ या काळात मुख्य संपादक झाल्या. विद्या बाळ यांनी ऑगस्ट १९८९ मध्ये 'मिळून साऱ्याजणी' हे मासिक सुरू केले. सध्या त्या 'इच्छामरण' या संकल्पनेसंबंधी जनजागृती करत आहेत. त्यांच्याकडून 'इच्छामरण' समजून घेण्याचा हा एक प्रयत्न:

प्र. कायद्याने आणि जनमानसाने स्वीकारावे म्हणून तुम्ही काम करत असलेले 'इच्छामरण' हे प्रकरण नेमके आहे काय?

उ : इच्छामरणाचे दोन वेगवेगळे पैलू आहेत. एक म्हणजे "LIVING WILL". त्यामध्ये माणसाला तो जिवंत असताना त्याला कुठले वैद्यकीय उपचार देऊ नयेत हे लिहून ठेवता येईल. मरण अटळ असतं पण ते कधी आणि केव्हा येईल हे सांगता येत नाही. आपण त्यावेळी होणाऱ्या वेदनांना घाबरत असतो. कुठल्याही कारणाने मी कोमामध्ये गेले किंवा बेशुद्ध झाले आणि सलग १५ दिवस माझ्या तब्येतीत सुधारणा झाली नाही तर माझे उपचार बंद करण्यात यावेत व मला वेदनारहित मरण द्यावे असं "LIVING WILL" मला करता आलं पाहिजे. किमान वयाच्या साठी-सत्तरीनंतर ती महत्वाची गोष्ट आहे. दुसरा पैलू म्हणजे "QUALITY OF LIFE". माझं जगायचं तेव्हढं जगून झालंय आणि आता मिळवावं असं माझ्या आयुष्यात काही राहील नाही. "QUALITY OF LIFE" राहिलेली नाही तर मला माझ्या मर्जीनं मरता आलं पाहिजे. "RIGHT TO LIFE" मध्ये "RIGHT TO DEATH" समाविष्ट असलं पाहिजे.

प्र. मग "आत्महत्या" आणि "इच्छामरण" यात काय फरक राहिला?

उ : आत्महत्या ही निराशेतून येणारी आहे. इच्छामरण हे आयुष्याच्या पूर्णत्वाच्या भावनेतून येणारे आहे.

प्र. पण मग हे इच्छामरण अंमलात कसे आणायचे?

उ : "LIVING WILL" हे आत्ताच्या मृत्युपत्राच्या पद्धतीनेच अंमलात आणले जाऊ शकते. डॉक्टरचे प्रमाणपत्र जोडणे वगैरे. आणि दुसऱ्या 'QUALITY OF LIFE' पद्धतीच्या इच्छामरणाच्या संकल्पनेमध्ये एखाद्याने इच्छामरणाचा अर्ज दिला तर त्यानंतर ६ महिन्याच्या कालावधी मध्ये मानसशास्त्रज्ञ, पोलिसयंत्रणा, डॉक्टर यांच्याशी त्याच्या मुलाखती घडवून आणल्या जाऊ शकतात. या तज्ज्ञांनी दिलेल्या रिपोर्टवरून त्याचे इच्छामरणाचे कारण आणि त्याला त्यासाठी परवानगी दिली पाहिजे कि नाही हे ठरवले जाऊ शकते. मग त्याला चित्र काढताना, गाणी ऐकताना, आप्तेष्टांसोबत जसं हवं तसं मरण दिलं पाहिजे जे वेदनारहित असेल.

प्र. कुठल्या देशामध्ये या संकल्पनेसदृश्य कायदा सध्या अस्तित्वात आहे का?

उ : स्वित्झर्लंड मध्ये. आणि तो यशस्वीरीत्या राबवला जात आहे. पण आपण म्हणत असलेले दुसऱ्या पद्धतीचे इच्छामरण ही मात्र अजून तरी फक्त साहित्यिक व वैचारिक संकल्पना आहे. ती कुठेही अस्तित्वात नाही.

प्र. कायद्याने आणि नागरिकांनी इच्छामरण ही संकल्पना स्वीकारावी म्हणून भारतात आत्तापर्यंत काय प्रयत्न झाले?

उ : वेगवेगळी चर्चासत्र घडवून आणणे, त्यासाठी डॉक्युमेंटरी प्रदर्शित करणे, पुस्तके प्रकाशित करणे आणि मुळात हा विषय जनमानसात चर्चेला आणणे असे सध्या आमचे उद्दिष्ट आहे. अरुणा शानबागपासून न्यायालयासमोर या प्रश्नावर अनेक याचिका गेल्या पण एकतर त्या फेटाळल्या गेल्या किंवा त्या न्यायालयाला तितक्या महत्वाच्या वाटत नसल्याने अजून ऐकल्याच गेल्या नाही आहेत. इच्छामरणावर चर्चा व्हायला पाहिजे असे त्या म्हणतात.

नेमाडेंचा संत तुकारामाविषयक दृष्टीकोन

पुस्तक परीक्षण
: रोहिदास खेडकर

मराठी संतसाहित्यात संत तुकाराम या कवीबद्दल आजवर चरित्र, काव्य, नाटक, कादंबरी, समीक्षा इत्यादी अंगाने लेखन झाले. त्याचप्रमाणे संत तुकारामांच्या काव्याची दखल इंग्रजी साहित्यात देखील घेण्यात आली. भालचंद्र नेमाडे यांचे तुकाराम हे मूळ इंग्रजी पुस्तक साहित्य अकादमीच्या भारतीय साहित्याचे निर्माते ह्या मालेसाठी लिहिले आहे. सन १९८० साली प्रकाशित झालेल्या या पुस्तकाचे भाषांतर चंद्रकांत पाटील ह्यांनी मराठी आणि हिंदी अशा दोन्ही भाषेतून केले. डॉ. सदानंद मोरे, डॉ. किशोर सानप, दि. पु. चित्रे, भालचंद्र नेमाडे इत्यादी अभ्यासकांनी समिक्षणपर लेखन केले व संत तुकारामांची अस्सल ओळख करून दिली. संत तुकाराम हे केवळ भक्ती करणारे नसून त्याहीपलीकडे एक संवेदनशील मनाचा विचारवंत, आत्मनिष्ठ कवी, समाजसुधारक इतके व्यापक व्यक्तिमत्व कसे आहे,हे संत तुकारामांच्या काव्याचा आधार घेऊन स्पष्ट करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. भालचंद्र नेमाडे यांनी देखील 'तुकाराम' या पुस्तकात चिकित्सक व वस्तुनिष्ठ सर्वांना प्रमाण वाटेल अशी समीक्षा केली आहे.

नेमाड्यांनी यात संत तुकारामकालीन पार्श्वभूमी मध्ये समाज, संस्कृती, मुस्लिम आक्रमणे, चातुर्वर्ण्य व्यवस्था, धार्मिक अवडंबर, नैसर्गिक आपत्ती यांसारख्या अनेक उलाढाली कशा स्वरूपाच्या आहेत यासंबधीचा विचार मांडला आहे. संत तुकारामांनी एक आदर्श व्यक्ती, संत, कवी, समाजसुधारक, विचारवंत होण्याचा बहुमान कशा स्वरुपात मिळवला, यासंबंधीचा विचार भालचंद्र नेमाडे यांनी 'तुकाराम : कवी आणि संत' या प्रकरणातून मांडला आहे. सर्वसामान्य माणसाप्रमाणे जीवनात येणाऱ्या सर्व प्रसंगांना सामोरे जाऊन ;आत्मचिंतनातून लोक चिंतन करून सामाजिक हित जोपासण्याचे कार्य संत तुकारामांनी केले. सामन्यातून असामान्यत्व निर्माण करण्याची ताकद प्रत्येक माणसात असते, याचा वस्तुपाठ तुकारामांनी समाजाला कशापद्धतीने दाखवून दिला आहे, याबाबतचा विचार प्रस्तुत 'तुकाराम' या पुस्तकात मांडला आहे.

मध्य प्रदेशच्या राजकारणात महिलांचा अभाव

राज्यकारण

निवडणुक जिंकण्याची कितीही क्षमता असली तरी जेव्हा तिकीट द्यायची वेळ येते तेव्हा सर्व पक्ष स्त्रियांना तिकीट द्यायला निरुत्साही असलेले दिसतात.

सध्या कार्यरत असणाऱ्या राजकीय स्त्रियांच्या मते हा कुठल्या विशिष्ठ पक्षाचा प्रश्न नाही पण एकंदरीतच मतदान प्रक्रिया स्त्रियांच्या दृष्टीने अनुकूल होण्याची गरज आहे. भाषणांमध्ये स्त्रियांच्या सक्षमतेच्या आणि समानतेच्या गप्पा मारणारे राजकारणी त्यातलं काहीही अंमलात आणताना दिसत नाहीत. स्त्री आरक्षण कायद्याच्या मसुद्याप्रमाणे ३३% जागा स्त्रियांसाठी राखीव असणं अपेक्षित असताना कुठल्याही पक्षात स्त्रियांची संख्या १०% हुन अधिक नाही.

आकडेवारीनुसार २००८ च्या निवडणुकीत निवडून येण्याचा दर एकूण उमेदवारांमध्ये ६.९% तर महिलां उमेदवारांमध्ये १०.८% . हाच दर २०१३ च्या निवडणुकीमध्ये अनुक्रमे ८.३% व १५% झालेला दिसून येतो. २०१३ च्या निवडणुकीत भाजपचे २०२ पुरुष उमेदवार तर फक्त २८ स्त्री उमेदवार होत्या. कॉंग्रेसने केवळ २३ स्त्री उमेदवारांना तिकीट दिले होते. आत्ता लोकसभेमध्ये एकूण ३३ महिला प्रतिनिधी आहेत त्यापैकी अधिकतर स्त्रिया या तगड्या राजकारणी पार्श्वभूमीच्या कुटुंबातून आलेल्या आहेत. निवडणुका या तात्कालिक ज्वलंत विषयावर लढवल्या जातात, ज्या गोष्टीची समाजात 'हवा' आहे, त्यावर निवडणुकांचे अजेंडा ठरतात.

सुनीत जाधव 'आशिया श्री २०१८' ; भारताची ऐतिहासिक कामगिरी

क्रीडा
विक्रम मोरे

बालेवाडी, पुणे : येथे नुकत्याच २ ते ६ ऑक्टोबरदरम्यान ५२व्या 'आशिया श्री' या आंतरराष्ट्रीय शरीरसौष्ठव अजिंक्यपद स्पर्धा पार पडली. यामध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या मुंबईच्या सुनीत जाधवने अंतिम फेरीत ५२व्या एशियन बॉडीबिल्डिंग अँड फीजिक्स स्पर्धेत 'आशिया श्री २०१८' हा मानाचा किताब पटकावला. सुनीत हा किताब पटकवणारा पहिलाच भारतीय ठरला आहे. आतापर्यंत सुनीतने तीन वेळा 'भारत श्री', पाच वेळा 'महाराष्ट्र श्री', 'दुबई क्लासिक', तळवलकर क्लासिक, फेडरेशन चषक, अशा अनेक स्पर्धेत अजिंक्यपद मिळवले आहे. या स्पर्धेत आशिया खंडातील एकूण १९ देशाच्या जवळपास ४५० ते ५०० खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

ही स्पर्धा पुण्यातील म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलाच्या बॅडमिंटन हॉल मध्ये राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय खेळाडू, पंच, प्रशिक्षक, पदाधिकारी व असंख्य क्रीडा प्रेमी यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. या स्पर्धेत भारताने पाच सुवर्ण, सहा रौप्य,चार कांस्य अशा एकूण १५ पदकांची कामगिरी करत स्पर्धेत आपला ठसा उमटवला. पुरुष शरीरसौष्ठव या मुख्य स्पर्धेबरोबरच, यावेळी महिला शरीरसौष्ठव, महिला बॉडी फिगर, महिला स्पोर्ट फिझिक अजिंक्यपद, त्याचप्रमाणे पुरुष फिझिक, स्पोर्ट फिझिकस, "मास्टर श्री", व "दिव्यांग श्री" व विविध प्रकारच्या स्पर्धा विविध गटात पार पडल्या.

पारितोषिक वितरणासाठी एशियन बॉडीबिल्डिंग फेडरेशनचे अध्यक्ष दतुक पॉलचूआ, इंडियन ओलंम्पिक चे सहसचिव नामदेव शिरगावकर, इंडियन बॉडीबिल्डिंग फेडरेशन चे अध्यक्ष प्रेमचंद डोग्रा, उपाध्यक्ष मधुकर तळवलकर, सरचिटणीस चेतन पठारे उपस्थित होते. आपल्या विजयानंतर सुनीत म्हणाला की,"भारताला सतत हुलकावणी देत आलेला हा किताब पटकावल्याबद्दल खूप आनंद वाटतोय. या खेळात मला सदैव साथ देणाऱ्या माझ्या पत्नीचे मी खूप आभार मानतो. या विजयाबद्दल सुनीत जाधव यांच्या पत्नी स्वप्नाली जाधव म्हणाल्या की त्यांनी मुंबई येथे एनआईआईटी मध्ये कौन्सिलर ची नोकरी सोडून पाच वर्षे आपल्या पतीसाठी पूर्ण वेळ दिला आहे, त्यांच्या डाएट वर खूप लक्ष्य दिले, गेल्या कित्येक वर्षांपासून घेतलेल्या

याप्रसंगी इंडियन बॉडीबिल्डिंग फेडरेशनचे चेतन पठारे म्हणाले की, "भारताने सुनीतच्या रूपाने आज ऐतिहासिक कामगिरी केली आहे, आम्हाला विश्वास होता की तो या स्पर्धेत नक्कीच यश मिळवेल, आणि त्याने ते सिद्ध करून दाखवले, आजून त्याने या खेळात खूप प्रगती करावी, संघटना सदैव त्याच्या पाठीशी आहे".

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे(प्रत्येक गटातील सुवर्णपदक विजेते)- ५५किलो- नितीन म्हात्रे (भारत),६०किलो- भास्करन(भारत),६५किलो-तुन मिन(म्यानमार),७०किलो-खुंतल फौंगपेट(थायलंड), ७५ किलो- शौफुल्ल बिन अहेमद (सिंगापूर),८०किलो-ऐ बॉबी सिंग(भारत),८५ किलो-यतीनंदर सिंग(भारत),९०किलो-सुनीत जाधव(भारत),१००किलो-साद जुबेर नेमाद(इराक),१००-किलोवरील मोहम्मद हरूनआझमी(अफगाणिस्तान). मुख्य विजेता सुनीत जाधव (भारत).

भवताल

युनोच्या मानवाधिकार समितीचा भारत सदस्य

जिनीव्हा : राष्ट्र संयुक्त राष्ट्र (UNITED NATIONS)संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार समितीमध्ये आशिया पॅसिफिक क्षेत्रातून सदस्य म्हणून भारताची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. दिनांक ०१ जानेवारी २०१९ पासून पुढील तीन वर्षे भारत या मानवाधिकार समितीचा सदस्य असेल.

एसबीआयच्या एटीएम वापरावर निर्बंध

मुंबई : भारतीय स्टेट बँकेने आर्थिक व्यवहारातील देवाणघेवाणीच्या बाबतीत महत्त्वाचा बदल केला आहे. एक नोव्हेंबरपासून ग्राहक एटीएम मधून एका दिवसात फक्त वीस हजार रुपयांची रक्कम काढू शकणार आहेत. सध्या ग्राहक जुन्या नियमांनुसार एटीएम मधून एका दिवसात दोन वेळेस प्रत्येकी वीस हजार रुपये याप्रमाणे चाळीस हजार रुपयांची रक्कम एटीएम मधून काढू शकतात. १ नोव्हेंबर पासून ग्राहकांना या नियमांचे पालन करावे लागणार आहे, अशी सूचना भारतीय स्टेट बँकेतर्फे देण्यात आली

मांडे 'सीएसआयआर'चे महासंचालक

पुणे : वैज्ञानिक आणि औद्योगिक विकास परिषदेचे (सी एस आय आर) चे महासंचालक म्हणून डॉक्टर शेखर मांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉक्टर मांडे हे रचनात्मक जैवशास्त्रज्ञ (स्ट्रक्चरल बायोलॉजिस्ट) आहेत.

पुणे-सिंगापूर विमानसेवा १ डिसेंबरपासून

पुणे : दिनांक १ डिसेंबरपासून सिंगापूर विमान सेवा पुणेकरांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या विमान सेवेमुळे प्रवासाचा कालावधी कमी होऊन पाच ते सहा तासाने प्रवाशांचा वेळ वाचणार आहे. तसेच यामुळे व्यापार, पर्यटन व दळणवळणाला उत्तेजन मिळेल अशी प्रशासनाकडून आशा व्यक्त करण्यात येत आहे.

डेक्कन क्वीनमध्ये फिरते ग्रंथालय

मुंबई : दिनांक १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने मध्य रेल्वेच्या डेक्कन क्वीन आणि पंचवटी एक्सप्रेस या दोन रेल्वे गाड्यांमध्ये फिरते ग्रंथालय हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या दोन गाड्यांमधील आरक्षित डब्यांमध्ये मराठी भाषा विभागाच्या राज्य मराठी विकास संस्थेने नेमलेल्या वाचनदूत यांच्यामार्फत प्रवाशांना विनाशुल्क वाचन सेवा देण्यात येणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागाच्या विद्यार्थ्यांचे प्रायोगिक प्रकाशन. *प्रकाशक : डॉ. उज्ज्वला बर्वे (विभागप्रमुख) *विद्यार्थी संपादक : मृणाल शुक्ल, आशिष कोठावदे, मृगंधा दीक्षित, विक्रम मोरे, स्नेहा पाटोळे, रोहिदास खेडकर.